दैनिक
# व्याघ्र शौर्यम
उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.
epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com
▪ जळगाव ▪ वर्ष - 1 ▪ अंक - २७८ ▪ बुधवार, दि.०८ जुलै २०२६ Reg. No.MHMAR/25/A2382 ▪ पाने - 8 ▪ किंमत रु.2

# अहमदाबाद बॉम्बस्फोट; ३८ जणांना फाशी!

## ११ जणांना जन्मठेप कायम : हायकोर्टाचा ऐतिहासिक निकाल

**अहमदाबाद ।** गुजरातमधील २००८ च्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात गुजरात हायकोर्टाने अत्यंत महत्त्वाचा आणि चर्चेचा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील विशेष न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला आव्हान देणाऱ्या दोषींच्या याचिका हायकोर्टाने फेटाळून लावत ४९ दोषींवरील शिक्षा कायम ठेवली आहे. यामध्ये ३८ दोषींना सुनावण्यात आलेली फाशीची शिक्षा तसेच ११ दोषींना ठोठावण्यात आलेली जन्मठेप कायम राहणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती ए. वाय. कोगजे आणि न्यायमूर्ती समीर दवे यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण फाशीचा निकाल दिला. विशेष न्यायालयाच्या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व प्रमुख अपीलांवर सुनावणी केल्यानंतर न्यायालयाने दोषींच्या याचिका फेटाळल्या. त्यामुळे विशेष न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात आला असून या निकालाकडे देशभराचे लक्ष लागले होते. दि. २६ जुलै २००८ हा दिवस गुजरातच्या इतिहासातील सर्वात भीषण दिवसांपैकी एक मानला जा-तो. अहमदाबाद शहरात अवघ्या ७०




मिनिटांच्या कालावधीत २० वेगवेगळ्या ठिकाणी तब्बल २१ साखळी बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले होते. या भीषण स्फोटांमध्ये ५६ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर २०० हून अधिक जण गंभीर आणि किरकोळ जखमी झाले होते. शहरातील रुग्णालये, सार्वजनिक ठिकाणे आणि गर्दीच्या परिसरांना लक्ष्य करून हे स्फोट घडवण्यात आले होते. या हल्ल्यामुळे संपूर्ण गुजरात हादरले होते. देशभरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते आणि सुरक्षा यंत्रणा उच्च सतर्कतेवर ठेवण्यात आल्या होत्या.

या प्रकरणाचा दीर्घकाळ तपास आणि सुनावणी झाल्यानंतर विशेष न्यायालयाने अनेक आरोपींना दोषी ठरवत ३८ जणांना फाशीची शिक्षा आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात दोषींनी गुजरात हायकोर्टात अपील दाखल केले होते.

### आव्हान देणार का?

२००८ मध्ये झालेल्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोटाने संपूर्ण देशाला हादरवले होते. त्या भीषण घटनेतील दोषींना विशेष न्यायालयाने सुनाव-लेली शिक्षा गुजरात हायकोर्टाने कायम ठेवत मोठा निर्णय दिला आहे. ३८ दोषींना फाशी आणि ११ दोषींना जन्मठेप कायम ठेवण्यात आल्याने या दीर्घकालीन न्यायालयीन प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. पुढे सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान दिले जाते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पूरग्रस्तांना तातडीने मदत, नुकसानग्रस्ताला वंचित ठेवणार नाही!

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे


**नागपूर ।** राज्यातील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासन हायअलर्टवर असून, पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहचवली जाईल. कोणत्याही नुकसानग्रस्ताला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांची बैठक घेऊन जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. महसूलमंत्री बावनकुळे यांनी आज नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधत राज्यातील पूरपरिस्थिती, दीक्षाभूमी विकास आराखडा, २२ जुलै रोजीचे महाअभियान आणि राजकीय मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडली.



राज्यातील पूरपरिस्थितीचा आढावा घेताना महसूलमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी कालच सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. कोणतीही जीवितहानी होऊ नये, याला सरकारचे पहिले प्राधान्य आहे. महसूल विभागावर नुकसानग्रस्त भागांच्या सर्वे क्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, संपूर्ण पंचनामे करून कोणतीही नुकसानभरपाई प्रलंबित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. निकषांनुसार घरांची पडझड, खावटी आणि इतर तातडीची मदत तात्काळ वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दीक्षाभूमी येथील वादावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, दीक्षाभूमी ट्रस्टमधील वादात शासनाची कोणतीही भूमिका नाही. मात्र, दीक्षाभूमीच्या भव्य विकासासाठी शासनाने आराखडा तयार केला आहे.

# उड्डाण पुलाजवळील पाण्याच्या खड्ड्यात बुडून तिघा मित्रांचा दुर्दैवी मृत्यू

**अमळनेर ।** शहरातील चोपडा रोडवरील उड्डाण पुलाजवळ पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून तीन अल्पवयीन मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे अमळनेर शहरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.





प्राथमिक माहितीनुसार, अमळनेर येथील सिंधी कॉलनी परिसरात राहणारे तिघे मित्र पोहण्यासाठी उड्डाण पुलाजवळील पाण्याने भरलेल्या खड्ड्याकडे गेले होते. पोहत असताना ते खोल पाण्यात बुडाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत तिघांनाही पाण्याबाहेर काढले. त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिघांनाही मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. मृत मुलांची ओळख आणि दुर्घटनेचे नेमके कारण याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# जबाबदार पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणार!

## मुख्यमंत्र्यांची घोषणा : बुलढाण्यातील घटनेची विधानसभेत चर्चा

**मुंबई ।** जळगाव जामोद (जि. बुलढाणा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात महिलेचा अर्धवट जळालेला आणि शिरच्छेद केलेला मृतदेह सापडल्यानंतर, पोलिसांनी कोणताही ठोस तपास न करता तो मृतदेह बेपत्ता असलेल्या शिवानी कलमेकर नावाच्या युवतीचा असल्याचे गृहीत धरले. इतकेच नव्हे, तर तिच्या निष्पाप वडील व भावाला खुनाच्या खोट्या आरोपाखाली अटक करून न्यायालयासमोर हजर केले. मात्र, काही दिवसांनी ती बेपत्ता मुलगी स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाली




आणि पोलिसांच्या अत्यंत बेजबाबदार कारभाराचे धिंडवडे निघाले. पोलिसांचा हा प्रताप मंगळवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चांगलाच गाजला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित पोलीस निरीक्षक आणि उपनिरीक्षकांसह सर्व दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित केले असून, विहित प्रक्रिया पूर्ण करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ (निष्कासित) करण्याची तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मोठी घोषणा सभागृहात केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणाचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. मे २०२६ मध्ये जळगाव जामोद येथे एका अज्ञात महिलेचा छिन्नविच्छिन्न मृतदेह सापडला होता. पोलिसांनी कोणतीही वैज्ञानिक चाचणी किंवा डीएनए पडताळणी पूर्ण न करताच, केवळ दाव्याच्या आधारावर संशयित म्हणून त्या मुलीच्या वडिलांना आणि भावाला अटक केली. या गरीब कुटुंबाला पोलिसांनी अतोनात शारीरिक व मानसिक त्रास (टॉर्चर) दिल्याचा आरोप करत रोहित पवार यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. चुकीची कारवाई करणाऱ्या अशा सर्व पोलिसांना बडतर्फ करून खात्यात कठोर संदेश द्यावा, मूळ मृतदेह कोणाचा आहे याचा तपास किती दिवसांत लागणार हे स्पष्ट करावे आणि पोलिसांनी केलेल्या छळामुळे पीडित ठरलेल्या या गरीब कुटुंबाला राज्य सरकारकडून ५ ते १० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार का, असे प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केले.

cmyk

## संपादकीय

# रामभूमीतले नापास विद्यार्थी!

देशभरात पेटलेले आरोप-प्रत्यारोपांचे रान, विशेष पोलिस पथकाची नियुक्ती आणि अटकसत्र या महिन्याभराच्या गदारोळानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणग्यांमधील अपहाराबाबत मौन सोडले आहे. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी या विषयावर मांडलेल्या भूमिकेतून कोट्यवधी रामभक्तांची वेदना व्यक्त होतेच; तसेच या संवेदनशील मुद्द्यावरील अस्वस्थता आणि कोंडीचेही दर्शन झाल्यावाचून राहात नाही.

मंदिर उभारणीतला संघाचा सहभाग आणि संघ परिवारातील विश्व हिंदू परिषदेतील वरिष्ठांचा सहभाग असलेल्या विश्वस्त मंडळाच्या सदस्यांवरील आरोपांमुळे संघ व्यथित होणे साहजिकच आहे. त्या पार्श्वभूमीवर होसबळे यांनी हिंदू समाज व रामभक्तांच्या भावनांना या प्रकरणाने तीव्र धक्का बसला, अशी भूमिका मांडून दोषींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली आहे. कारणे काहीही असोत; महिन्याभरात या विषयात नवनवे आरोप होत असतानाही संघाने तोंडावर बोट ठेवल्याने शंका-कुशंकांना वाव मिळाला. रामजन्मभूमी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक दशकांपासून अतूट बंध आहेत. या मुद्द्यावर जनमत संघटित करण्यापासून बाबरी मशिदीचे पतन आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मंदिराची उभारणी या सर्व घटनाक्रमात संघशक्तीने दिलेले योगदान कोणालाही नाकारता येणार नाही. आता मात्र याच स्वप्नपूर्तीचे प्रतीक ठरलेल्या श्रीराम मंदिरामध्ये भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेली रोख दक्षिणा आणि दागदागिन्यांची चोरी-अपहार झाल्याच्या आरोपांमुळे जनमानस ढवळून निघाले आहे. समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी या विषयावरून आरोप केले, तेव्हा ते गांभीर्याने घेण्यासारखे नाहीत, असा काणाडोळा करण्याचा प्रयत्न विश्वस्त, राज्य-केंद्र सरकार आणि संघ परिवाराकडूनही झाला. मात्र, त्यानंतर काँग्रेस, आम आदमी पक्षापासून ते शिवसेना (उबाठा) आणि अगदी असदुद्दीन ओवेसी यांच्यापर्यंत अनेकांनी या प्रकरणावरून आरोपांची राळ उडवून दिली. विशेष म्हणजे रामजन्मभूमी आंदोलनातील आघाडीचे शिलेदार विनय कटियार आणि भाजपचे माजी खासदार बृजभूषण सिंह असे नेतेही हल्ले करू लागल्याने भाजप-संघाची कोंडी झाली. अखेर या प्रकरणी नियुक्त केलेल्या विशेष तपास पथकाने आठ जणांना अटक केली आहे.

विश्वस्त मंडळाचे माजी सचिव चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी राजीनामेही दिले आहेत. मात्र, यापूर्वी देणग्यांच्या मोजणी प्रक्रियेतील त्रुटी-गैरप्रकार निदर्शनास आल्यानंतर झालेली डोळेझाक आणि तक्रारदारांचीच उचलबांगडी आणि अटकेतील संशयितांमध्ये विश्वस्तांच्या विश्वासू व्यक्तींचा समावेश यांमुळे संशयाचे धुके गहिरे झाले. त्या पार्श्वभूमीवर संघाच्या भूमिकेतून डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न दिसतो. त्यामुळे वेळीच सडेतोड भूमिका घेतली असती, तर अधिक प्रांजळपणाचे दर्शन घडते; मात्र जुन्या सवयीनुसार मौनं सर्वार्थ साधनंचा राग आळवत बसल्याने या विषयाला अनेक फाटे फुटले. आता देणग्यांपाठोपाठ या आरोपांचे लोण तेथील जमीन खरेदीपर्यंत पोहोचले असून, ते कुठवर जाणार, हे सांगता येत नाही. येऊ घातलेल्या उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत हा मुद्दा पेटवण्याचे प्रयत्न विरोधकांकडून होणार, असे स्पष्ट दिसते. आरोपांनंतर आता वरिष्ठांनी लक्ष घातल्यानंतर येथील व्यवस्थेत सुधारणा होतील, अशी अपेक्षा आहे. अयोध्येतील स्थानिक समीकरणे, ट्रस्ट व राज्य सरकारमधील चढाओढ आणि दिल्ली-लखनौमधील सख्य यांचेही पदर यामागे असावेत.

श्रीराम आणि अयोध्या ही शतकानुशतके भारतीयांची श्रद्धास्थाने असून त्यांचे स्थान भविष्यातही अढळ राहणार आहे; मात्र मंदिर प्रशासनामध्ये काटेकोर आर्थिक व्यवस्थापन आणि पारदर्शकता ठेवल्यावरच ही श्रद्धा आणि विश्वासालाही बळ मिळेल, हे विसरून चालणार नाही. पूर्वी संघसंस्कारात वाढलेले भाजप नेते भ्रष्टाचारात सापडल्यावर नापास विद्यार्थी अशी संघाने केलेली टिप्पणी गाजली होती. अशा नापासांची वाढती संख्या हा काळाचा महिमा! चौफेर विस्तार होत असताना चारित्र्य निर्माणाकडे अधिक लक्ष द्यावे लागेल, एवढेच या कथेचे तात्पर्य.

# पहले भी यूँ तो बरसे थे बादल...

पाऊस सुरू झाला की, मंझिल चित्रपटातील अमिताभ बच्चन व मौशमी चॅटर्जी यांच्यावर चित्रित झालेले रिमझिम गिरे सावन हे गाणे दरवर्षी सर्वांच्याच ओठांवर येते. दोन वर्षांपूर्वी शैलेश-वंदना इनामदार या दांपत्याने मुंबईतील त्याच सर्व स्थळी जाऊन हे गाणे स्वतःवर त्याच शैलीत पुनर्चित्रित केले होते. तो सर्वांच्याच औत्सुक्याचा विषय ठरला होता. या दाम्पत्याने या गीतातील अवखळ व रोमँटिक भाव आपल्या वयाच्या साठीतही चपखल टिपले होते, साकारले होते. त्या १९७९ मध्ये चित्रित झालेल्या गीतातील मुंबई आपल्या सर्वांना आजही तशीच दिसते का, तशी जगता येते का, हा रुक्ष प्रश्न आज निश्चितच मनात येतो. त्यामुळेच पहले भी यूँ तो बरसे थे बादल या ओळींपाशी थोडे थबकून आपण विचारात पडतो पूर्वीही ढग बरसायचे, पाऊस यायचा, मग आताच का तो पहिल्याच ओंजळीत धिंगाणा ठरू लागला?

या गाण्यात चित्रित झालेले मरिन ड्राइव्ह, गेटवे ऑफ इंडिया ही ठिकाणे पावसाची मजा लुटण्यासाठी नेहमीच सर्वांना खुणावतात. पावसाची एखादी लाट क्वीन्स नेकलेस ओलांडून कैवल्यधामच्या पदपथावरही तुम्हाला भिजवते, तेव्हा तुम्ही अवाक होता; परंतु या सर्व ठिकाणी पावसाळ्यातील लाटा, सोसाट्याचा वारा अनुभवल्यावर अनेकांच्या मनांत धस्स होते. खरेतर इतक्या विलंबाने आलेला पाऊस बरसल्यावर त्याचे मुंबईकरांना मनमुराद स्वागत करता यायला हवे होते; परंतु त्यांनी पावसाचा धसकाच अधिक घेतला आहे.

पहले भी यूँ तो बरसे थे बादल हो हे तर खरेच. पूर्वीही अशी मुंबई बंद पडण्याइतकी ढगफुटी व्हायची नाही का मुंबईत? नक्कीच व्हायची. जुलै महिन्याच्या मध्यास असा बदाबदा पाऊस कोसळायचा. मग दक्षिण मुंबईत नळबाजार, भेंडीबाजार, नागपाडा, ताडदेव, हिंदमाता, किंग्जसर्कल अशा भागांत पाणी साचायचे. बेस्ट बसेस त्यातूनही लाटा मागे सरत बदलत्या रूटवरून मार्ग काढायच्या. पूर्वीच्या मिणमिणत्या दिव्यांच्या आणि वायुवीजन कमी असलेल्या लोकलगाड्या शीव-कुर्ला दरम्यान मान टाकायच्या. मग दक्षिण मुंबईत कार्यालयापर्यंत पोहोचलेले उपनगरवासी आपल्या गिरगाव-गिरणगावातल्या चाळकरी नातलगांकडे मुक्काम ठोकायचे. पब्लिक टेलिफोनवरून कसेबसे शेजाऱ्यांकडे आपले कुशल कळवायचे. मुंबई ही सात बेटांची बनलेली आहे आणि तासाभरात १०० मिलिमिटर पाऊस झाला तर, पाणी तुंबणारच, असे चाकोरीतले उत्तर दर वर्षी नवनवे महापालिका आयुक्त पत्रकारांना द्यायचे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्प पूर्ण झाला तरच फरक पडेल, अशी आशाही नंतर काही आयुक्त दाखवू लागले. लोहमार्गाची उंची सहा इंचाने वाढवली, तर रेल्वे बंद पडणार नाही, असे रेल्वेचे अधिकारी सांगायचे. मिलन सबवे पाण्याखाली गेलाय का, शीव-कुर्ला ट्रॅक पाण्याखाली गेलाय का, हे पूर्वी नियंत्रण कक्षाला पावसाची खरी खबरबात विचारण्याचे पत्रकारांचे परवलीचे प्रश्न असायचे.

कालांतराने रेल्वेट्रॅक वर उचलले गेले, फलाटांची उंची वाढली, ब्रिमस्टोवॅड पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले, हिंदमाता-किंग्जसर्कल टाळणारे आणि इतर मिळून ५५ उड्डाणपूल अवतरले. चारचे सहा ट्रॅक झाले, मेट्रो साकारली. मग आता तरी ही पावसातली त्रेधातिरपिट थांबायला हवी होती ना? अगदी १९७९ मधली मंझिल सोडा; पण मुंबईकरांचा पावसाळा थोडा तरी सुखद व्हायला नको का? लोकलमधून बसल्या जागी आपले क्षेमकुशल कळवायला आज हाताशी मोबाइल आलेत; परंतु लोकलमधले दरवाजे लावण्यासाठी आवाज द्यायलाही आज लोक चार वेळा विचार करू लागलेत. गर्दीमधून तुम्हाला तुमच्या स्टेशनावर उतरण्यास मदत करणारी माणसे हरवली आणि धारदार शस्त्रे बाळगणारे प्रवासी कधी शिरले? छोट्या बच्चे कंपनीला साचलेल्या पाण्यात कागदाची होडी सोडण्याचा आनंद मिळे. आता तिथे कुठल्याशा वायरचा करन्ट नाही ना, अशी भीती पालकांना सतावते. रस्त्यातून चालताना झाडाच्या फांदीकडे पाहावे की उघड्या मॅनहोलकडे लक्ष द्यावे? पूर्वीही बादल बरसलेच की, मग आता हे असे चाल करून का येताहेत, मुंबईकरांवर?

# सिंधूकरार स्थगितीचे शस्त्र

इतिहास आणि वर्तमान यांपासून काहीच शिकायचे नाही, असा विडाच जणू पाकिस्तानने उचललेला असावा. या देशाचा इतिहास विखारी भारतद्वेषाचा. हा इतिहास वर्तमानात देखील सातत्याने प्रकटत असतो. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात पाकिस्तानचे बगलबच्चे असलेल्या दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे नृशंस हल्ला करून २६ पर्यटकांची हत्या केली. त्यानंतर भारताने तातडीने आक्रमक पावले टाकून उभय देशांदरम्यानचा सिंधू जलवाटप करार स्थगितीचे शस्त्र उपसले. या संदर्भात पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री आणि पर्यावरणमंत्री अशा दोन जबाबदार मंत्र्यांनी आगखाऊ विधाने नुकतीच केली. त्या पार्श्वभूमीवर, सिंधू जलवाटप करार स्थगितच आहे आणि जोवर पाकिस्तान दहशतवादाला आश्रय देणे थांबवत नाही, तोवर तो स्थगितच राहील, असे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पाकिस्तानला ठणकावले.

सिंधू जलवाटप करार भारताने स्थगित करणे हा पाकिस्तानने स्वतः स्वतःच्या पायावर मारून घेतलेला धोंडा आहे. डोक्यावर कमालीचे कर्ज, आकाशाला भिडलेली महागाई, बलुचिस्तानातील चळवळ अशा समस्यांचा पाकिस्तान चारही बाजूंनी सामना करीत आहे. शरीफ सरकारवर तेथील सामान्यांचा रोष उफाळून आलेला आहे. अशा स्थितीत मूळ समस्यांवरून सामान्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तानातील आजवरचे प्रत्येक सरकार जी क्लृप्ती वापरत आली तीच या सरकारने वापरली... भारतविरोध. दहशतवादाला सर्वंकष आश्रय देण्याचे थांबवणे दूरच, उलट सिंधू जलवाटप करारावरून त्या सरकारमधील मंत्र्यांनी भारतावर केलेली आगपाखड हा त्याचाच एक भाग. एक उल्लेखनीय बाब म्हणजे दोन्ही देशांदरम्यान संवादाचा मार्ग पुन्हा खुला व्हावा, असे आवाहन दोन्ही देशांतील काही मान्यवरांनी नुकतेच केले. असा संवाद होऊच नये, असा एक कट्टर, विखारी मतप्रवाह पाकिस्तान सरकारात आहे. पाकिस्तानी मंत्र्यांच्या आगपाखडीमागे असा काही मतप्रवाह नसणारच, असे छातीठोकपणे सांगणे कठीण. असे नसेल तर ठीकच; पण जर असेल तर विखारी इतिहासाची पाने वर्तमानातही सतत उलगडत राहणारा पाकिस्तान यातून काहीही साध्य करू शकणार नाही, हे निश्चित.

दैनिक व्याघ्र शौर्यम

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम-६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र - ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382

printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

# डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांना भाजपकडून अभिवादन

**जळगाव :** भारतीय जनता पार्टी महानगरच्या वतीने भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त तसेच जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची भक्कम पायाभरणी करून पक्षाला स्वतंत्र ओळख निर्माण करून देणारे ज्येष्ठ नेते स्व. चंद्रकांत (मेंढकी) काका यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाला बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाचे राष्ट्रीय संयोजक प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रवाद, एकात्मता आणि अखंड भारताच्या संकल्पनेसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. तसेच जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक उभारणीत स्व. चंद्रकांत मेंढकी यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उल्लेख करत त्यांच्या कार्याला भावपूर्ण अभिवादन केले.

यावेळी भारतीय जनता पार्टी जळगाव महानगरचे जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महापौर दिपमाला काळे, गटनेते प्रकाश बालाणी, माजी जिल्हाध्यक्ष उज्वला बेंडाळे, महानगर सरचिटणीस विशाल त्रिपाठी, नितीन इंगळे, ज्येष्ठ कार्यकर्ते उदय भालेराव, रेखा वर्मा, दीपक परदेशी, अशोक राठी, भूषण लाडवंजारी, ललित बडगुजर, सागर पाटील, दीप्ती चिरमाडे, नगरसेवक निलेश तायडे, जितेंद्र चव्हाण, सैनिक आघाडी संयोजक राजेंद्र मराठे, राजश्री सोनवणे, शिरीष तायडे, दिलीप लाडवंजारी, युवा मोर्चा सरचिटणीस रोहित सोनवणे, हर्षल सिखवाल, अमित देशापांडे, अशोक कोष्टी, दीपक कोळी, तुषार सूर्यवंशी, डॉ. नितीन पाटील, सरोज पाठक, प्रशांत सावंत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या राष्ट्रनिष्ठ, समाजाभिमुख आणि संघटनात्मक विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कृषी पायाभूत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**जळगाव :** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत देशात विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे.

ही योजना ऑगस्ट २०२० मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून, पिक काढणीनंतरच्या कृषी पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांच्या निर्मितीसाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व विपणन यांना चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. लाभार्थ्यांना बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरेंटीची सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिली जाते. योजनेअंतर्गत गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट, कस्टम हायरिंग सेंटर तसेच इतर कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. शेतकरी व संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी, आत्मा, कृषी विभाग अथवा जवळच्या राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. तसेच https://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प संचालक यांनी केले आहे.

# गोविंदा रिक्षा दुचाकी नेली चोरुन स्टॉपसमोरुन

**जळगाव :** शहरातील गोविंदा रिक्षा स्टॉपजवळील कृष्णा मेन्स वर्ड दुकानासमोरुन महेश बिभीषण केळे (वय ३९, रा. शिवाजी नगर) यांची (एमएच २४, एझेड ९५९३) क्रमांकाची दुचाकी दि. ५ जुलै रोजी दुपारच्या सुमारास चोरट्यांनी चोरुन नेली. ही घटना उघडकीस आल्यानंतर केळे यांनी संपुर्ण परिसरात दुचाकीचा शोध घेतला. मात्र तरी देखील मिळून न आल्याने अखेर त्यांनी दि. ६ जुलै रोजी शहर पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सफौ सुनिल पाटील हे करत आहे.

# जळगावात इन्फिनिटी कॅफेवर पोलिसांचा छापा

**जळगाव :** शहरातील एम. जे. कॉलेज परिसरातील ९० फूट रोडवरील इन्फिनिटी कॅफेवर रामानंद नगर पोलिसांनी छापा टाकून परवान्याशिवाय सुरू असलेल्या कॅफेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कॉफी शॉपच्या नावाखाली संशयास्पद पद्धतीने बंदिस्त कॅबिन उपलब्ध करून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्री सुमारे १२.५० वाजण्याच्या सुमारास इन्फिनिटी कॅफेमध्ये तपासणी करण्यात आली. यावेळी संबंधित ठिकाणी कॉफी शॉप चालविण्याचा आवश्यक परवाना नसल्याचे आढळून आले. तसेच प्रत्यक्षात कॉफी किंवा इतर खाद्यपदार्थांची विक्री न करता, आतमध्ये लाकडी कंपार्टमेंट तयार करून त्यामध्ये सोफ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. या बंदिस्त जागांचा वापर तरुण-तरुणींना बसण्यासाठी तसेच अश्लील कृत्यांसाठी जागा उपलब्ध करून दिल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

या प्रकरणी कॅफे चालक धीरज भगवानसिंग बागुल (वय २८, रा. सुप्रीम कॉलनी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १२९ व १३१(अ)(क) अन्वये रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे करीत आहे.

# एलसीबीचा दणका; दुचाकी चोरांची धुलाई!

## रेकॉर्डवरील चोरट्यांचा समाचार : पोलिसांची विशेष मोहिम

**जळगाव :** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून दुचाकी चोरांनी धुमाकूळ घातला असून, सर्वसामान्यांची वाहने लंपास करण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या चोरांचा सुळसुळाट मोडून काढण्यासाठी आणि त्यांना जरब बसवण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने सोमवारी सकाळी थेट क्शन मोडमध्ये येत मोठी कारवाई केली. जिल्ह्यातील सर्व रेकॉर्डवरील ५० ते ६० दुचाकी चोरांना पोलीस अधीक्षक कार्यालय



परिसरात आणून त्यांची जोरदार उलथापालथ करण्यात आली. एलसीबीच्या या धडक कारवाईमुळे चोरट्यांचे धाबे दणाणले आहेत. जळगाव शहर आणि परिसरातून दररोज दुचाकी चोरीला जाण्याच्या घटना घडत आहेत. पोलिसांसमोर हे मोठे आव्हान निर्माण झाले होते. अखेर स्थानिक गुन्हे शाखेने या चोरांना वठणीवर आणण्यासाठी विशेष मोहीम राबवली. संपूर्ण जिल्ह्यातील संशयित आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या दुचाकी चोरांना सकाळीच ताब्यात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात आणण्यात आले. एलसीबीच्या पथकाने या सर्व चोरट्यांची कसून चौकशी केली. त्यांचे सद्यस्थितीतील पत्ते, ते सध्या काय करत आहेत, आणि अलीकडच्या काळातील चोरीच्या गुन्ह्यांमध्ये त्यांचा काय सहभाग आहे, याचा संपूर्ण कच्चा चिठ्ठा पोलिसांनी बाहेर काढला. यावेळी एलसीबीच्या खास स्टाईलने चौकशी केल्यामुळे अनेक चोरांची चांगलीच तारांबळ उडाली. या कारवाईमुळे दुचाकी चोरांच्या टोळ्यांचे कंबरडे मोडण्यास मदत होणार असून, आगामी काळात चोरीच्या घटनांना आळा बसेल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# आ. खडसेंच्या प्रश्नानंतर प्रशासकीय हालचालींना वेग!

## पुरनाड येथील अवैध उत्खनन प्रकरण : बी.एन.ए. इन्फ्रास्ट्रक्चरला दंड

**मुक्ताईनगर** ✍ प्रतिनिधी

तालुक्यातील पुरनाड येथील गट क्र. १९६ व त्या परिसरातील रस्त्याच्या कामासाठी करण्यात आलेल्या अवैध उत्खननाबाबत आमदार एकनाथ खडसे यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित करून महसूल विभागाचे लक्ष वेधले होते. या प्रश्नाद्वारे त्यांनी, कोणतीही रीतसर परवानगी न घेता गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक केल्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले असून, संबंधित जमीन मालक, कंत्राटदार आणि दोषी महसूल अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, असा जाब सरकारला विचारला होता.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लेखी स्वरूपात उत्तर देताना स्पष्ट केले की, महामार्गाच्या कामासाठी नियुक्त बी.एन.ए. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लि. या कंत्राटदाराने परवानगीपेक्षा अधिक उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणातील कारवाईचा भाग म्हणून कंत्राटदाराकडून वाढीव उत्खननासाठी एकूण १ कोटी ३४ लाख रुपये स्वामित्वधन रक्कम भरून घेण्यात आली आहे, तसेच विनापरवाना उत्खनन केलेल्या अन्य एका गटातील अतिरिक्त उत्खननासाठी १२ हजार रुपये स्वामित्वधन रक्कम वसूल करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, विनापरवाना गौण खनिज वाहतूक करणाऱ्या कंत्राटदाराच्या चार डंपरवर कारवाई करून १ लाख १८ हजार ४४० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार आता या क्षेत्राची ईटीएस मोजणी करून अतिरिक्त उत्खनन आणि दंड वसुलीबाबतची कार्यवाही करण्याचे आदेश तहसीलदार, मुक्ताईनगर यांना देण्यात आले आहेत आणि संबंधित कंत्राटदाराला यापुढे विनापरवाना उत्खनन न करण्याबाबत लेखी ताकीद देण्यात आली आहे.

# जळगावात सोमवारी पीएम नॅशनल अप्रेंटिसशिप मेळावा

**जळगाव** । औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागिर योजनेतील व्यवसायातील प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत आस्थापनामध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण घेण्याकरीता भरती मेळावा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयोजित करण्यात आला आहे. हा भरती मेळावा सोमवार दि. १३ जुलै रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील आयटीआय शिल्पकारागीर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या तसेच दहावी, बारावी, डिप्लोमा आणि पदवी उत्तीर्ण उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये अप्रेंटिसशिपची संधी उपलब्ध करून देण्यासाठी पीएम नॅशनल अप्रेंटिसशिप मेळाचे आयोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान राष्ट्रीय अप्रेंटिसशिप योजनेअंतर्गत आयोजित या मेळाव्यात जळगाव जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, पात्र उमेदवारांना थेट अप्रेंटिसशिपसाठी निवडीची संधी मिळणार आहे. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी संबंधित उमेदवारांनी ApprenticeshipIndia.org या वेब पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह मेळाव्याच्या दिवशी उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांनी केले आहे.

# कत्तलीचा उद्देश; एका विरुद्ध गुन्हा दाखल

**चोपडा** । शहरातील सानेगुरुजी वसाहत परिसरात कत्तलीच्या उद्देशाने गाय, बैल व वासरू यांना निर्दयतेने बांधून ठेवण्यात आल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पोलीस कर्मचारी अक्षय विजय पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. सोमवार, दि. ७ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास चोपडा शहरातील बंद कत्तलखान्यासमोरील के.जी.एन. कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या सानेगुरुजी वसाहत परिसरात संशयित आरोपी इद्रीस ईस्माईल शेख याच्या घरासमोरील ओट्यावर पत्र्याच्या शेडच्या आडोशाला जनावरे बांधून ठेवलेली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार घटनास्थळी पाहणी केली असता, सुमारे ५० हजार रुपये किमतीची गावरान जातीची गाय, ५० हजार रुपये किमतीचा गावरान जातीचा बैल तसेच २० हजार रुपये किमतीचे पांढऱ्या रंगाचे वासरू अशी एकूण १ लाख २० हजार रुपये किमतीची जनावरे आढळून आली. पोलिसांच्या फिर्यादीनुसार, संबंधित जनावरांना कोणत्याही प्रकारची चारा व पाण्याची व्यवस्था न करता अंधारात अत्यंत निर्दयतेने जखडून बांधून ठेवण्यात आले होते. प्राथमिक तपासात ही जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

# जयंत पाटील–विनोद तावडेंमध्ये गुप्त बैठक?

**मुंबई** ✍ प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ऑपरेशन टायगरमुळे झालेल्या राजकीय भूकंपाची तीव्रता कमी होत असतानाच, आता राज्यात आणखी मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार विनोद तावडे या दोघांमध्ये मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये शुक्रवारी गुप्त बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या दोन बड्या नेत्यांच्या भेटीमुळे शरद पवार गट सत्तेत सामील होणार का, याबाबतच्या चर्चांना उधाण आले आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्यात झालेल्या या बैठकीत शरद पवार यांचा पक्ष जर महायुती आणि केंद्र स्तरावर राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी झाला, तर पक्षाच्या वाट्याला सत्तेत काय वाटा येऊ शकतो, यावर सविस्तर खल झाल्याचे समजते. या दोन्ही नेत्यांच्या चर्चेनंतर जयंत पाटील यांनी लागलीच राष्ट्रवादीच्या आणखी एका अत्यंत वरिष्ठ नेत्याची भेट घेऊन चर्चा केली. शरद पवार यांच्या पक्षात सध्या सत्तेत सहभागी होण्याबाबत दोन मतप्रवाह असल्याचे बोलले जात आहे. यातील एका गटाला सत्ताधारी बाकांवर बसण्याची इच्छा आहे, तर दुसरा गट विरोधी पक्षातच राहण्यावर ठाम आहे. या पार्श्वभूमीवर, शरद पवार यांनी आपल्या पक्षातील एका ज्येष्ठ नेत्यावर विधानसभेतील १० आमदार आणि लोकसभेतील ८ खासदारांशी चर्चा करून त्यांचे मत जाणून घेण्याची, तसेच भाजपच्या वरिष्ठ पातळीवर बोलणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवल्याची चर्चा आहे. या संपूर्ण प्रकरणावर जयंत पाटील यांना विचारले असता, त्यांनी भाजप नेते विनोद तावडे यांच्याशी मुंबईत भेट झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. मात्र, ही बैठक केवळ अनौपचारिक चर्चेसाठी होती, असे सांगत त्यांनी यातील राजकीय तपशील जाहीर करण्याचे टाळले. शरद पवार यांचे राजकारण हे नेहमीच धक्कातंत्रासाठी ओळखले जाते. पवारांची नेमकी राजकीय भूमिका काय असेल, याचा ठोस अंदाज वर्तवणे भल्याभल्यांना जमत नाही, त्यामुळे या भेटीकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात आहे.

# आषाढी वारीसाठी यावल आगाराची गाव तिथे एसटी योजना

## गावातील ४० प्रवासी असल्यास थेट गावात येणार लालपरी

**यावल :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकरी आणि भाविकांच्या सोयीसाठी यावल ए.टी. आगाराने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मगाव तिथे एसटीफ या विशेष उपक्रमांतर्गत मवारकरी तिथे लालपरी, सेवा तिथेफ ही संकल्पना राबविण्यात येत असून, तालुक्यातील जास्तीत जास्त भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावल एसटी आगाराचे व्यवस्थापक दिलीप महाजन यांनी केले आहे.

महाराष्ट्राची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा असलेली पंढरीची वारी ही सुमारे ७०० ते ८०० वर्षांहून अधिक जुनी आहे. या महान परंपरेची सुरुवात संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांच्या काळापासून म्हणजेच १३ व्या शतकात झाली. त्यानंतर संत नामदेवांनी या परंपरेला लोकचळवळीचे व्यापक स्वरूप दिले. तेव्हापासून दरवर्षी आषाढी एकादशीला वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक भक्तीभावाने पंढरपुरात दाखल होतात. यावर्षी देखील यावल तालुक्यातील भाविकांना पंढरपूरचा प्रवास सुखद आणि सुटसुटीत व्हावा यासाठी आगार प्रशासनाने चोख नियोजन केले आहे. या योजनेअंतर्गत यावल तालुक्यातील ज्या गावातून पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या किमान ४० इतकी असेल, त्या गावासाठी आगारामार्फत स्वतंत्र आणि थेट एसटी बस गाडीची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील वृद्ध आणि महिला भाविकांना मुख्य बसस्थानकापर्यंत येण्याचा त्रास वाचणार असून, त्यांना आपापल्या गावातूनच थेट विठ्ठल चरणी जाणे शक्य होणार आहे.

पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या तालुक्यातील इच्छुक भाविक, भजनी मंडळे आणि वारकऱ्यांनी आपल्या गावातील प्रवाशांची यादी तयार करून त्वरित यावल एसटी आगाराशी संपर्क साधावा, जेणेकरून वेळेवर बसचे नियोजन करणे सोपे होईल, असे आगार व्यवस्थापक दिलीप महाजन यांनी शेवटी नमूद केले. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी यावल एसटी आगाराने मगाव तिथे एसटीफ अंतर्गत विशेष बस सेवा सुरू केली असून, एका गावातून ४० प्रवासी उपलब्ध झाल्यास थेट गावापासून पंढरपूरसाठी स्वतंत्र बस दिली जाणार आहे. पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या तालुक्यातील इच्छुक भाविक, भजनी मंडळे आणि वारकऱ्यांनी आपल्या गावातील प्रवाशांची यादी तयार करून त्वरित यावल एसटी आगाराशी संपर्क साधावा, जेणेकरून वेळेवर बसचे नियोजन करणे सोपे होईल, असे आगार व्यवस्थापक दिलीप महाजन यांनी शेवटी नमूद केले.

# पोकरा योजनेत भडगाव तालुक्यातील सर्व गावांचा समावेश करा

## शेतकरी संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**भडगाव :** शासनाच्या पोकरा योजनेत संपुर्ण भडगाव तालुक्याचा समावेश करावा. शासनाच्या योजनेचा लाभ शेतकर्यांना दयावा. या मागणीचे निवेदन भडगाव तहसिलदार शितल सोलाट यांना शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अखिलेश पाटील, रामकृष्ण माळी यांचेसह पदाधिकार्यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

भडगाव तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात नमुद केलेले आहे कि, भडगाव तालुक्याचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक व इतर संकटांवर मात करीत मोठया कष्टाने पिकांचे उत्पादन घेत असतात. मात्र कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटासह शेतमालाला उत्पादनइतकाही बाजार भाव मिळत




नसल्याने शेती क्षेत्र व शेतकरी उध्वस्त होत आहेत.शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी राज्यात जागतिक बँक अर्थ सहाय्यीत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प(पोकरा) राबविला जात आहे. परंतु या योजनेत भडगाव तालुक्यातील ५९ गावांपैकी फक्त २७ गावांचा समावेश (पोकरा योजनेत) आहे. उर्वरित ३२ गावांचा समावेश या योजनेत करून तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवुन दयावा. अशा मागणी संबंधीचे निवेदन शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष अखिलेश पाटील यांनी भडगाव तहसीलदार यांना दिले आहे.

शेतकऱ्यांसाठी ही पोकरा योजना अत्यंत गरजेची असल्यामुळे शेतकऱ्यांकडुन उर्वरित गावे या प्रकल्पात नव्याने समाविष्ट करण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी(पोकरा) योजनेत ट्रॅक्टर, पावर टिलर, स्वयंचलित यंत्रे, पीक संरक्षक उपकरणे, काढणी पश्चात उपकरणे, पेरणी यंत्र, कांदा चाळ,शेडनेट, पॉलिहाऊस, फळबाग लागवड, बांबु लागवड, नवीन विहीर, ठिबक व तुषार सिंचन, शेततळे, गोड्या पाण्यातील मत्स्य पालन, पंप संच व पाईप, शेळीपालन, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडूळ व सेंद्रिय खत निर्मिती, वृक्ष लागवड, भूजल पुनर्भरण, मृद व जलसंधारण इत्यादी कामांचा समावेश आहे. त्यामुळे ही योजना तालुक्यातील सर्वच गावातील शेतकऱ्यांना वरदान ठरणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने पोकरा योजनेत भडगाव तालुक्यातील संपूर्ण गावांच्या समावेश करावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष अखिलेश पाटील, उपाध्यक्ष वाल्मीक लोखंडे, रामकृष्ण माळी, सरदारसिंग पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरटीआयतील बदल मागे घ्या : सपकाळे

**भुसावळ** प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने १२ जून २०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संदर्भात प्रसिद्ध केलेली नवीन अधिसूचना तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी राज्य पत्रकार संघटनेचे भुसावळ तालुकाध्यक्ष संघरत्न सपकाळे यांनी केली आहे. ही अधिसूचना नागरिकांच्या माहिती मिळवण्याच्या घटनात्मक अधिकारावर गंभीर आघात करणारी असून माहिती अधिकार कायद्याच्या मूलभूत उद्दिष्टांनाच हरताळ फासणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

याबाबत भुसावळचे प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, माहितीचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेतील कलम १९(१)(अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग आहे. सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमध्ये याला मान्यता दिली आहे. शासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचाराविरोधातील लढ्यात माहितीचा अधिकार हे सर्वसामान्य नागरिकांचे प्रभावी शस्त्र ठरले आहे.

मात्र, नव्या अधिसूचनेतील नियमांमुळे माहितीचा अधिकार अधिक गुंतागुंतीचा,



खर्चीक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः नियम २०(३) अंतर्गत अपील किंवा तक्रारीच्या सुनावणीदरम्यान वकिलांची मदत घेण्यास मनाई करणारी तरतूद ही न्यायप्रवेशाच्या मूलभूत अधिकारावर आघात करणारी असल्याचे सपकाळे यांनी म्हटले आहे. तसेच अर्जदारांकडून ओळखपत्र मागणे, माहिती मागण्यामागील कारण विचारणे, पुनरावृत्तीच्या अर्जांवर निर्बंध घालणे आणि विविध शुल्कांमध्ये वाढ करणे या तरतुदी माहिती अधिकाराच्या मूळ उद्देशालाच बाधा आणणाऱ्या असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी ही अधिसूचना तात्काळ रद्द करावी, अशी मागणी संघरत्न सपकाळे यांनी केली असून यासंदर्भातील निवेदन त्यांच्या वतीने भुसावळचे प्रांताधिकारी यांना सादर करण्यात आले.

# जामनेरात बंद घरावर चोरट्यांचा डल्ला दाखल

**जामनेर :** घरातील मंडळी पुणे येथे गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून रोख रक्कम आणि सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना जामनेर शहरातील दर्शन पार्क, वाकी रोड परिसरात उघडकीस आली आहे.

या प्रकरणी जामनेर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी वर्षा ज्ञानेश्वर पाटील (वय ४०) या कुटुंबासह ४ जुलै रोजी पुणे येथे गेल्या होत्या. ४ जुलैच्या रात्री ९ वाजेपासून ते ६ जुलैच्या पहाटे ५ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटातील रोख रक्कम व दागिने चोरून नेले. चोरट्याने घरातून सुमारे १५ हजार रुपयांचे मंगळसूत्र, १४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, चांदीचे जोडवे, पायातील पैंजण तसेच ३० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच जामनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक बाबींच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**चोपडा :** जीवनधारा फाउंडेशनच्या वतीने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खाऱ्यापाडाव येथील जि.प शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत शाळेतील इयत्ता चौथीच्या एकूण ९९ आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींना वह्या, लेखन साहित्य व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची अधिक उत्साहाने सुरुवात करण्यासाठी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमास पोलीस पाटील कलरसिंग बारेला, राजाराम पावरा, तुकाराम पावरा, नानू पावरा, प्रमिला पावरा, भुरीबाई पावरा, मुख्याध्यापक विजय कचवे, शिक्षक रवींद्र पाटील, कैलास बारेला तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चितोडे वाणी समाजाची नूतन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी नरेंद्र वाणी, उपाध्यक्षपदी संजय सराफ

**वरणगाव :** वरणगाव येथील चितोडे वाणी समाज संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षपदी नरेंद्र दशरथ वाणी तर उपाध्यक्षपदी संजय वसंत सराफ यांची बिनविरोध निवड झाली.

शहरातील चितोडे वाणी समाज संस्थेची स्थापना ७ जुलै १९५३ रोजी झाली होती. संस्थेने ७ जुलै २०२६ रोजी यशस्वी वाटचालीची ७३ वर्षे पूर्ण केली. संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याला अधिक गती मिळावी या उद्देशाने नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी राहुल अनिल श्रावगे, सचिवपदी महेश दत्तराज गोडबोले, सहसचिवपदी सचिन प्रकाश सराफ यांची निवड करण्यात आली. तसेच सदस्यपदी मनोज पंडित वाणी व योगेश जितेंद्र वाणी, तर




महिला सदस्यपदी ज्योती महेश गोडबोले, ममता मनोज वाणी, सुरेखा जीवन सराफ आणि ललिता संदीप अकोले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या निवड प्रक्रियेसाठी अनंत गडे तसेच महिला व युवक मंडळाचे मोलाचे योगदान लाभले. समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र आणून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी मंडळ सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विशेष म्हणजे, शासनाच्या नियमांनुसार संस्थेला दर्पण आयडी प्राप्त झाला असून, कायदेशीर व पारदर्शक कारभार करणाऱ्या संस्थांमध्ये चितोडे वाणी समाज संस्थेची ओळख निर्माण झाली आहे. नव्या कार्यकारिणीच्या निवडीबद्दल समाजबांधवांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बारदान आले; आता उद्दिष्ट संपले, भडगावात हमीभाव खरेदी पुन्हा ठप्प

## ज्वारी-मका उत्पादक शेतकरी अडचणीत; मोजणीचे उद्दिष्ट वाढविण्याची मागणी

**भडगाव** प्रतिनिधी

शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत भडगाव येथील शेतकरी सहकारी संघामार्फत सुरू असलेल्या ज्वारी व मका खरेदी केंद्रातील गोंधळामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. आठ ते दहा दिवस बारदानाअभावी खरेदी बंद होती. नुकतेच बारदान उपलब्ध झाल्यानंतर केवळ एक दिवस खरेदी सुरू झाली; मात्र ३० जून रोजी मोजणीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने खरेदी पुन्हा बंद करण्यात आली. त्यामुळे ऑनलाइन नोंदणी केलेल्या अनेक शेतकऱ्यांचे धान्य अद्यापही खरेदीच्या प्रतीक्षेत आहे.

खरीप हंगामातील पेरण्यांना वेग आला असतानाही रब्बी हंगामातील ज्वारी व मका हमीभाव केंद्रावर पडून असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे प्रशासन सुस्त, शेतकरी त्रस्त अशी परिस्थिती निर्माण झाल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

भडगाव येथील हमीभाव खरेदी केंद्र २५ मेपासून सुरू करण्यात आले. शासनाने मकासाठी ११ हजार क्विंटल तर ज्वारीसाठी ४,५०० क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट मंजूर केले होते. मकाला प्रति क्विंटल २,४०० रुपये तर ज्वारीला ३,६९९ रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला होता. यासाठी ज्वारीचे १,८१६ आणि मकाचे १६४ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती.

मात्र आतापर्यंत केवळ १६३ शेतकऱ्यांची ६,९०० क्विंटल ज्वारी आणि १९ शेतकऱ्यांचा ६०८ क्विंटल मका खरेदी करण्यात आला आहे. उर्वरित शेतकऱ्यांचा माल अद्यापही मोजणीच्या प्रतीक्षेत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कधी गोदामाची समस्या, कधी बारदानाचा तुटवडा तर आता



मोजणीचे उद्दिष्ट संपल्याचे कारण देत खरेदी थांबविली जात आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात धान्य विकण्याची वेळ येत असून त्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

यामुळे शासनाने तातडीने ज्वारी व मका खरेदीसाठीचे उद्दिष्ट वाढवून उर्वरित शेतकऱ्यांचा माल खरेदी करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तसेच या प्रश्नात आमदार किशोर पाटील यांनी लक्ष घालून शासनस्तरावर पाठपुरावा करावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

# बीएलओंशी समन्वय साधून एसआयआरच्या कामाला गती देण्याचे आवाहन

**पारोळा :** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या एसआयआर म्हणजेच मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण यासाठी बीएलओ यांच्या मार्फत कामकाज सुरू आहे. सदर कामास गती मिळावी व मतदार याद्यांचे कामकाज मुदतीत पार पाडावे यासाठी ग्राम पातळीवरील पारोळा तालुक्यातील सर्व पोलीस पाटील यांचे कार्यशाळा तहसीलदार डॉ. उल्हासराव देवरे यांच्या मार्गदर्शना खाली तहासिल कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी सर्व पोलीस पाटील यांना बीएलओ यांच्याशी समन्वय साधून गावातील मतदार यांना आधार कार्ड मोबाईल नंबर व आवश्यक असल्यास फोटो जमा करून बीएलओ यांच्याकडे जमा करणे बाबत आवाहन करण्यात आले. पारोळा तालुक्यात एकूण १८१ मतदान केंद्र असून सर्व ठिकाणी पोलीस पाटील यांनी सदर मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी पडताळणी व अनुषंगिक कामकाज यात सहकार्य करू असे आश्वासित केले आहे. पारोळा तालुक्यातील सर्व मतदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपल्या यादी भागातील बीएलओ यांना गणना फॉर्म भरण्यासाठी सहकार्य करावे जेणेकरून आपल्या नावाचे मॅपिंग होईल व नंतर होणारी गैरसोय टाळता येईल, असे आवाहन तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांनी शेवटी केले.

# वराड बसस्टॉपवरील झाडांमुळे वाढला अपघाताचा धोका

**वराड, ता. धरणगाव :** वराड बसस्टॉप परिसरात रस्त्यालगत वाढलेल्या झाडांमुळे जळगावकडून येणारी वाहने स्पष्टपणे दिसत नसल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांसह ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून या झाडांची छाटणी करण्याची मागणी केली जात आहे. वराड खुर्द येथील नागरिकांना एरंडोलकडे जाण्यासाठी वराड बुद्रुक बसस्टॉपपर्यंत उलट्या दिशेने जावे लागते. या मार्गावर जळगावकडून येणारी वाहने झाडांमुळे नजरेस न पडल्याने जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या ठिकाणी भविष्यात गंभीर अपघात होऊ नयेत, यासाठी संबंधित प्रशासनाने बसस्टॉप परिसरातील रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांची छाटणी करावी वा गरज असल्यास झाडे तातडीने हटवावीत, अशी मागणी वराड ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# बाळद येथील स्मशानभूमित सर्रास वृक्षतोड

**बाळद, ता. पाचोरा** प्रतिनिधी

येथील स्मशानभूमितील जवळपास २५ ते ३० लिंबाची १७ ते १८ वर्ष वयाची झाडे अज्ञात व्यक्तीने तोडणी केली आहे. यामुळे ग्रामस्थांसह निसर्गप्रेमींनी संताप व्यक्त करत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

बाळद येथील स्मशानभूमीत ग्रामपंचायतीने जवळपास ५ हजार लिंबाच्या झाडांची लागवड केलेली आहे. आज ही लिंबाची झाडे मोठे झाले आहे. जवळपास १७ ते १८ वर्षे वयाच्या २५ ते ३० लिबांच्या झाडांची गावातील काही निर्दयी व्यक्तींनी कत्तल केली आहे. या संदर्भात पाचोरा येथील वन विभागाच्या वनरक्षक सोनार यांनी येऊन प्रत्यक्ष कत्तल झालेल्या झाडांची पाहणी करुन पंचनामा केला. तसेच वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल,



असे त्यांनी आश्वासित केले. तसेच कृष्णा पवार यांनीही, या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच यापुढे कोणीही झाडे तोडणार नाही, याचे नियोजन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. पोलीस प्रशासनानेही याबाबत त्वरित कारवाई करावी व वृक्षतोड करणाऱ्यांना शासन करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. या वेळी पोलीस पाटील नितीन पाटील, सर्पमित्र सागर पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, रोजगार सेवक, घटनास्थळी हजर ग्रामस्थ होते.

# आरटीओ विभागातील गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी

**मुंबई** प्रतिनिधी

प्रादेशिक परिवहन (आरटीओ) विभागातील भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर वसुली प्रकरणाची राज्य शासनाकडून उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत केली. त्याचप्रमाणे, परिवहन विभागातील संघटित वसुली रॅकेटची आणि विशेषतः वादग्रस्त निवृत्त अधिकारी बजरंग खरमाटे प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आयपीएस अधिकारी प्रियांका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सभागृहात दिली. हे पथक एका महिन्याच्या आत आपला अहवाल सादर करणार आहे.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आरटीओ विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला. परिवहन विभागात एक मोठे आणि संघटित वसुली रॅकेट कार्यरत असल्याचा आरोप करत वडेट्टीवार म्हणाले, नागपूर आरटीओमध्ये चोरीच्या वाहनांची नोंदणी करण्यापासून ते वसुलीपर्यंतचे मोठे गैरव्यवहार सुरू असून, या रॅकेटमधील काही ठराविक अधिकाऱ्यांना १५ वर्षांहून अधिक काळ विदर्भातच पोस्टिंग देण्यात आले आहे. वडेट्टीवार यांनी या रॅकेटमध्ये सक्रिय असलेल्या बड्या अधिकाऱ्यांची नावे सभागृहात सांगितली. निवृत्त आरटीओ अधिकारी बजरंग खरमाटे, अकोल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, अमरावतीचे निलंबित मोटार वाहन निरीक्षक राजू नागरे, गोंदियाचे मोटार वाहन निरीक्षक आनंद मोहोड आणि खामगावचे निलंबित मोटार वाहन निरीक्षक योगेश खेसनार हे अधिकारी मिळून बेकायदेशीर वसुली करत असल्याचा आरोप त्यांनी केला. जे प्रामाणिक अधिकारी या वसुलीला नकार देतात, त्यांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जाते. ट्रान्सपोर्टरमार्फत खोटे तक्रारदार उभे करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा (एसीबी) ट्रॅप लावला जातो आणि अधिकाऱ्यांना अडकवून मानसिक त्रास दिला जातो, असे सांगत वडेट्टीवार यांनी या संदर्भातील ऑडिओ क्लिप्स अध्यक्षांना सादर केल्या. तसेच, महाराष्ट्रातील महागड्या आयातीत (इम्पोर्टेड) वाहनांची नोंदणी कर वाचवण्यासाठी इतर राज्यांत करून राज्याचा मोठा महसूल बुडवला जात असल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला.या गंभीर आरोपांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले. मुख्यमंत्री म्हणाले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मागच्या आठवड्यातच माझ्याशी या विषयावर सविस्तर चर्चा केली होती आणि आरटीओ विभागातील घोटाळ्यांची माहिती दिली होती. त्यांनी केलेल्या विनंतीनुसार या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल.

cmyk

# जुने मीटर बसवून द्या अन्यथा लोक नवीन मीटर स्वतः काढून महावितरण कडे जमा करतील - समाधान दामधर

**जळगाव जामोद।** प्रतिनिधी

८ जुलै रोजी जामोद महावितरण कार्यालयात नवीन स्मार्ट मीटर विरोधात आगळे वेगळे आंदोलन करण्यात आले. जामोद येथील नागरिकांनी स्वतः आप-आपल्या घरातील स्मार्ट विद्युत मीटर काढून महावितरण कार्यालयात जमा केले व गावातील सर्व स्मार्ट मीटर काढून जुने मीटर बसवून मिळण्या बाबत यावेळी शाखा अभियंता चौबारावाले व जामोद महावितरण चे सहाय्यक अभियंता हिंगणे यांना निवेदन दिले.

यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ओबीसी विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष समाधान दामधर यांनी आक्रमक पवित्रा घेत ७ दिवसाच्या आत सदर मीटर बदलून द्यावे व यानंतर जामोद मध्ये कुठेही स्मार्ट मीटर बसवू नये असे सांगितले. सदर निवेदनात नमूद आहे की, आम्ही महावितरण चे अनेक वर्षांपासून ग्राहक असून आमच्याकडे विद्युत बिलाची कुठलीही थकबाकी नसून आम्ही नियमित विद्युत बिल भरत असतो तसेच आमच्या मीटर बाबत महावितरण ला कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही. आमचे मीटर आम्हाला कुठल्याही प्रकारची



पूर्वसूचना न देता, आमची संमती न घेता कुण्या तरी अज्ञात व्यक्तीने परस्पर येऊन आमच्या घरासमोरील मीटर बदलले आहे. तरी आम्हाला आमचे जुने मीटर परत लावून मिळावे.

आज आम्ही गावातील तांत्रिक व्यक्तींच्या मदतीने घरातील नवीन मीटर स्वतः काढून प्राथमिक स्वरूपाने आपल्या कार्यालयाकडे जमा करीत आहोत, तरी सात दिवसाच्या आत गावातील सर्व नवीन मीटर काढून जुने मीटर परत बसून देण्यात यावे अन्यथा आम्ही आमच्या घरातील मीटर स्वतः काढून आपल्या कार्यालयात जमा करू व यामध्ये कुठलेही अनुचित घटना घडल्यास व जीवितहानी झाल्यास महावितरण व अधिकारी म्हणून आपली संपूर्ण जबाबदारी राहील. यावेळी गणेश धर्मे, शंकर दामधर, राजू किसन धुर्डे , रमेश पंढरी धुर्डे, महादेव रंदळे, दीपक ज्ञानेश्वर धर्मे, शेख मुसा, देवकाबाई दामधर, संतोष दलाल, सचिन काळपांडे, विश्वनाथ काळपांडे, प्रमोद हांडे, मोहन धुर्डे, सुनील काळपांडे, गजानन काळपांडे, संतोष राठी, समाधान वानरे, समाधान पिंजरकर, अमोल ढगे, गणेश धर्मे, रोशन अंबडकार, सुनील रंदळे, अनिल काळपांडे, हर्षल धुर्डे , सुचिताबाई धर्मे, उषाबाई काळपांडे, सुनीताबाई राऊत, प्रमिला धुरडे, संगीता काळपांडे, सुरज धर्मे, पुष्पा धर्मे, लिलाबाई धुर्डे, गणेश बोडखे सह अनेक नागरिक उपस्थित होते.

## तृतीयपंथीयांसाठी 'बीज भांडवल योजना'; व्यवसायासाठी २ लाखांपर्यंत कर्ज, ४५ टक्के अनुदान

**जळगाव।** प्रतिनिधी

राज्यातील तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'बीज भांडवल योजना' सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी २१ प्रकारच्या लघु व्यवसायांसाठी तसेच १२ प्रकारच्या व्यवसायांचे प्रशिक्षण व टूल किट खरेदीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

योजनेअंतर्गत लाभार्थ्याला एकूण भांडवलाच्या केवळ ५ टक्के रक्कम स्वतः भरावी लागणार असून ४५ टक्के रक्कम शासनाकडून अनुदान म्हणून तर उर्वरित ५० टक्के रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दली जाणार आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजदरात ३ टक्के सवलतही देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार महाराष्ट्राचा किमान १० वर्षांचा रहिवासी असावा. तसेच केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी केलेले तृतीयपंथीय ओळखपत्र असणे, वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असणे आणि व्यवसाय करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे.

योजनेअंतर्गत लघु कर्ज (रु. २५ हजारांपर्यंत), मध्यम कर्ज (रु. ५० हजारांपर्यंत) आणि दीर्घ कर्ज (रु. २ लाखांपर्यंत) अशी कर्जाची व्याप्ती तीन स्तरांवर निश्चित केली आहे, ज्यातून कोणत्याही एका कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी व्यवसायासाठीचा परवाना आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र (छजउ), व्यवसायासाठी लागणारी सामग्री, यंत्रसामग्री इत्यादींचे कोटेशन व पक्के बिले, जागेचा ७/१२ उतारा किंवा जागा भाड्याची असल्यास कायदेशीर भाडेकरारनामा, शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील परिपूर्ण अर्ज हे सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, जळगाव येथे सादर करावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, जळगाव योगेश पाटील यांनी केले आहे.

## मुंबई नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात कोसळली दरड ; वाहतुक संथ गतीने सुरू

**इगतपुरी ।** प्रतिनिधी

नाशिक मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या कसारा घाटात हिवाळा पॉईंट जवळ काही प्रमाणात डोंगरावरून दरडीसह माती व दगड रस्त्यात पडल्याची घटना सकाळी सात वाजेच्या सुमारास घडली होती.

याची माहिती शहापुरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे व आपत्ती व्यवस्थापन टीमला मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन युद्ध पातळीवर रस्त्यामधील दरडी हटवुन



महामार्ग सुरळीत केला. इगतपुरी तालुक्याला काल पासून रेड अलर्ट दिल्यामुळे व ढगफुटी होणार असल्याच्या माहितीमुळे प्रशासन अलर्ट मोडवर होते. त्यामुळे कसारा घाटात दरड कोसळल्याची माहिती मिळताच प्रशासनाने दरड हटवली असुन तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी स्वता: घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. जेसीबीच्या सहाय्याने दरड हटवल्यामुळे कसारा घाटातून वाहतुक संथ गतीने सुरळीत चालू झाली. विशेष म्हणजे गेल्या २४ तासात इगतपुरी तालुक्यात २०० मिमी. पावसाची नोंद झाली असून पावसाची संततधार सुरू असल्यामुळे आजही मोठ्या प्रमाणात पावसाची नोंद होणार आहे.

## ५७ हजार थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित; महावितरणकडून वीजबिल वसुली मोहिमेस वेग

**जळगाव।** प्रतिनिधी

परिमंडलातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील सुमारे दोन लाख ग्राहकांकडे थकीत १७७ कोटी रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने धडक मोहीम सुरू केली आहे. मागील जून महिन्यात वीजबिल थकबाकीमुळे ५७ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता आणि संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. तरी ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडित होण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

जळगाव परिमंडलात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील एकूण १ लाख ८७ हजार ५२४ ग्राहकांकडे १७७ कोटी ६९ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. यापैकी जळगाव मंडलातील १ लाख ८ हजार ६२४ ग्राहकांकडे ९६ कोटी ५७ लाख, धुळे मंडलातील ५६ हजार ७७६ ग्राहकांकडे ६० कोटी ६६ लाख व नंदुरबार मंडलातील २२ हजार १२४ ग्राहकांकडे २० कोटी ४७ लाख रुपयांची थकबाकी आहे.

थकबाकी वसुलीसाठी जळगाव परिमंडलातील जळगाव, धुळे व नंदुरबार मंडलात महावितरणतर्फे धडक वसुली मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक कर्मचारी या मोहिमेत प्रत्यक्ष ग्राहकांकडे भेट देऊन थकबाकी वसुलीसाठी सरसावले आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. तर जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्याची कारवाई या मोहिमेत करण्यात येत आहे. मागील जून महिन्यात जळगाव मंडलातील ३६ हजार ८२१, धुळे मंडलातील १३ हजार ३७६ व नंदुरबार मंडलातील ७ हजार १३४ ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीपोटी खंडित करण्यात आला. यामध्ये ५ हजार रुपयांवरील थकबाकीदारांचे सध्याचे मीटर व सर्व्हिस वायर काढून घेण्यात येणार आहे. यानंतरही ग्राहक अनधिकृतरित्या वीज वापरताना आढळला तर त्याच्यावर कायदेशीर पोलिस कारवाई करण्यात येत आहे. तरी जळगाव परिमंडलातील सर्व ग्राहकांनी थकबाकी व चालू वीजबिले भरून सहकार्य करावे व संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणच्या जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांनी केले आहे.

**वीजबिल भरण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध :**

वीजबिल भरण्यासाठी महावितरणने अधिकृत वीजबिल भरणा केंद्रांसह विविध ऑनलाईन पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. वीजबिलावरील क्यूआर कोड स्कॅन करून वीजबिल भरता येते. महावितरण मोबाईल प, ु.र-हरवळीलो.ळप हे संकेतस्थळ तसेच विविध यूपीआय पद्धारे घरबसल्या ऑनलाईन वीजबिल भरता येते. वेळेत ऑनलाईन वीजबिल भरल्यास ०.२५ टक्के सूटही मिळते. गो-ग्रीन योजनेअंतर्गत ई-वीजबिल पर्याय निवडल्यास एकरकमी १२० रुपये सूट मिळते तसेच महावितरणच्या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केल्यास ऑनलाईन वीजबिल भरण्याचे पर्याय उपलब्ध होतात.

दैनिक व्याघ्र शौर्यम Smart City
जळगाव ▪ बुधवार, दि.०८ जुलै २०२६
epaper.vyaghrashuryam.com


## ग.स. अध्यक्ष, उपाध्यक्षांची १५ जुलैला निवड

**जळगाव** : जिल्हा नोकरांची सहकारी पतपेढी अर्थात ग.स. सोसायटी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड दि.१५ जुलै रोजी होणार आहे. यासाठी जिल्हा उपनिबंधकांनी आज आदेश जारी करत निवड कार्यक्रम जाहिर केला आहे. दुपारी १२ वाजता ग.स. सोसायटीच्या सभागृहात ही निवड सहायक निबंधक डी. व्ही. पाटील यांच्या अध्यासी अधिकारींच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ग.स.सोसायटीचे अध्यक्ष अजबसींग पाटील यांचा राजीनामा गेल्या महिन्यातच संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुर करण्यात आला होता.

# भरवस्तीत गोळीबाराने भुसावळ हादरले!

## दुचाकीवरून आलेल्या दोघांचा थरारक हल्ला : अप्रिय घटनांची मालिका सुरुच

**भुसावळ** । शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीने पुन्हा एकदा डोके वर काढत असल्याचं दिसत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवघ्या आठ दिवसांत दोन खुनाच्या घटना ताज्या असतानाच सोमवारी रात्री भुसावळ शहर गोळीबाराच्या थराराने हादरले. दगडी पुला परिसरातील हनुमान मंदिराजवळ अज्ञात हल्लेखोरांनी एका तरुणावर गावठी कट्ट्यातून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

प्राथमिक माहितीनुसार, गोलू रायसिंग पंडित हे त्यांच्या घरासमोरील ओट्यावर बसलेले असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. गोळीबारानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून तातडीने पलायन केले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची



माहिती मिळताच बाजारपेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान, गोळीबाराचे नेमके कारण काय होते, किती गोळ्या झाडण्यात आल्या, या घटनेत गोलू पंडित जखमी झाले आहेत का, तसेच हल्लेखोरांची ओळख काय आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. या प्रकरणी बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. अधिकृत तपासानंतरच गोळीबारामागील कारण स्पष्ट होणार आहे.

**अप्रिय घटनांची मालिका**

भुसावळ शहरात गेल्या काही दिवसांपासून अप्रिय घटनांची मालिका सुरु असून ती खंडीत करण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे. खून, चोऱ्या, घरफोड्या या घटनांनी भुसावळकर भयभीत झालेले आहे. पोलिसांनी या घटनांना पायबंद घालावा अशी मागणी होत आहे.

## फुलगावात प्रौढाची गळफास घेऊन आत्महत्या

**भुसावळ** ✍ प्रतिनिधी

तालुक्यातील फुलगाव येथे दत्तात्रय (दत्तू) गोपाळ चौधरी (वय ४५) यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेमुळे फुलगाव परिसरात शोककळा पसरली असून, मयताच्या खिशात सुसाईड नोट आढळल्याने आत्महत्येमागील कारणाबाबत गूढ निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सुमारे ७ ते ७.३० वाजण्याच्या दरम्यान दत्तात्रय चौधरी यांनी घराच्या वरच्या मजल्यावरील छताला बसविण्यात आलेल्या लोखंडी पाईपाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. त्यावेळी घरात इतर कोणीही नसल्याचे सांगण्यात येत आहे. काही वेळाने ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नातेवाईक आणि ग्रामस्थांनी त्यांना तातडीने खाली उतरवून उपचारासाठी वरणगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुरावे गोळा केले. मयताच्या अंगझडतीदरम्यान त्यांच्या खिशातून एक सुसाईड नोट, गाडीची चावी, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र आणि मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

## आक्षेपार्ह रील्सवर पोलिसांचा डिजिटल वॉच!

### सायबर पॅट्रोलिंगद्वारे विशेष मोहीम सुरू : उदात्तीकरण, स्टंटबाजांवर होणार कारवाई

**जळगाव** । सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करत स्टंटबाजीचे व्हिडिओ पोस्ट करणारे तसेच महिलांचा अवमान करणारे रील्स तयार करून प्रसारित करणाऱ्यांविरोधात जळगाव पोलिसांनी विशेष सायबर पॅट्रोलिंग मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत संशयास्पद आणि आक्षेपार्ह रील्सची तपासणी करून संबंधित व्यक्तींना ओळख पटवत पोलिस मुख्यालयात बोलावण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोशल मीडियावर प्रसिद्धीच्या हव्यासापोटी काही तरुणांकडून गुन्हेगारांना नायकासारखे दाखवणारे, कायद्याचे उल्लंघन करणारे आणि समाजात चुकीचा संदेश देणारे व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित केले जात आहेत. अशा आशयाचा युवकांवर विपरीत परिणाम होत असून, गुन्हेगारीकडे आकर्षण निर्माण होण्याची शक्यता वाढत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्येही चिंता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले. सायबर पॅट्रोलिंगद्वारे अशा रील्सची बारकाईने तपासणी करण्यात येत असून संबंधित व्यक्तींना समुपदेशनासाठी पोलिस मुख्यालयात बोलावले जात आहे. या कारवाईचा उद्देश केवळ दंडात्मक नसून, समाजात कायद्याबद्दल आदर निर्माण करणे, तरुणांना चुकीच्या प्रवृत्तींपासून परावृत्त करणे आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्याबाबत जनजागृती करणे हा आहे. पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियाचा वापर करताना कायद्याचे पालन करण्याचे, समाजात तेढ निर्माण करणारी किंवा गुन्हेगारीला प्रोत्साहन देणारी सामग्री प्रसारित न करण्याचे आवाहन केले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करून समाजविघातक संदेश पसरवणाऱ्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# पुलानजीक ठेकेदारास लुटणारे तिघे गजाआड

**जळगाव** । रावेर तालुक्यातील अजंदा गावानजीक असलेल्या रेल्वे पुलानजीक मजूर पुरवण्याच्या बहाण्याने बोलावून एका बांधकाम ठेकेदाराची लूट करणाऱ्या तिघा लुटारूंना रावेर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. अटकेतील तिघांकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी शेख जावेद शेख अमान हे बांधकाम ठेकेदार असून मजूर मिळवून देण्याचे आमिष दाखवत लुटारुंनी त्यांना अजंदा येथे बोलावले. रेल्वे पुलाजवळ ते गेल्यानंतर त्यांना चाकूचा धाक



दाखवण्यात आला. त्यांच्या खिशातील रोख रक्कम तिघांनी हिसकावली. त्यानंतर मोबाईल फोनद्वारे ऑनलाइन व्यवहार करून वेगवेगळ्या खात्यांमध्ये सुमारे ८ हजार रुपये वर्ग करून तिघे लुटारु पसार झाले. रावेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सहका-यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे संशयीत आरोपींचा शोध सुरू केला. पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे डीबी पथकाने सापळा रचून तिघा संशयीतांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या तिघांमधे शेख मुस्तकीम शेख अकील (वय २२), शेख मोईन शेख नझीम (वय १९) आणि फैजल बेग हिदायत बेग (वय १९, सर्व रा. रावेर) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून एमएच-१९-ईडी-५५८० क्रमांकाची मोटारसायकल आणि गुन्ह्यात वापरलेला मोबाईल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी तिघांची पोलीस कोठडी मिळवून पुढील तपास सुरू ठेवला असून त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन, तुषार पाटील तसेच गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांनी करावे केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन करत आहेत.